मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७०२३, दिनांक ०८/०५/२०२० नुसार नवीन भोसरी रुग्णालयातील तयार करणेत आलेल्या कोरोना वॉर्डसाठी (मोशी कोव्हीड सेंटर व नविन जिजामाता रुग्णालय आयसोलेशन कक्ष) दैनंदिन साफसफाईच्या कामकाजाकरीता लागणारे आवश्यक ते मनुष्यबळ ४५ कर्मचारी व ४ सुपरवायझर उपलब्ध करुन देणेकामी दिलेल्या आदेशाची मुदत दिनांक १२/१२/२०२० रोजी संपुष्टात आलेने किमान वेतन दरानुसारच सध्याचा सार्स कोव्हीड-२ प्रादुर्भाव व परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता पुढील तीन महिने कालावधीसाठी मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., यांचे समवेत करण्यात आलेल्या करारनाम्यास अधिन राहून किमान वेतन कायदयानुसार र.रु.१२,८८,६१४/- प्रति महा प्रमाणे (सर्व खर्चासहीत) येणा-या र.रु.३८,६५,८४२/- (अक्षरी र.रू. अडोतीस लाख पासष्ठ हजार आठशे बेचाळीस फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३२३ विषय क्रमांक – ३१

दिनांक – ०३/०२/२०२१ विभाग – वैद्यकिय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/२/कावि/७३/२०२१, दि.२७/०१/२०२१

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

ज्येष्ठ वैदयकिय अधिकारी नविन भोसरी रुग्णालय यांनी दिनांक 25/3/2020 रोजीच्या पत्रान्वये आहाराबरोबर पाण्याची प्रति रुग्ण २-३ बॉटल व बिस्कीटचा १ पुडा देण्याबाबत मागणी केली आहे. दिनांक १३/३/२०२० पासुन उक्त सुविधा देण्यात येत आहेत. सदर सुविधा दिनांक १३/६/२०२० पर्यत कोरोनाचा वार्डमध्ये पाणीबॉटल व बिस्कीट देण्यात आली आहेत. मे.क्वॉलिटी केटरर्स, वाय.सी.एम.रुग्णालय, पिंपरी यांचेकडील दरपत्रक प्राप्त केलेले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| अनु.क्र | साहित्याचे नाव | स्पेसिफिकेशन | दर सर्व करासहित व पोहच |
|---|---|---|---|
| १ | पाणी बॉटल | १ लिटर (ISO) | २०/- |
| २ | बिस्कीट | Gulucose-60grm,Mari,-83 grmGood day-60grm | १०/- |

वरील प्रमाणे दर मा.आयुक्त यांचेकडून दि.३०/०३/२०२० रोजी स्विकृत करणेत आलेले आहेत. या दराप्रमाणे एकूण अंदाजे र.रु.८,००,०००/- खर्चास मा.स्थायी समिती सभेची मान्यता ठराव क्र.७१८७ दि.२४/०६/२०२० अन्वये घेणेत आलेली आहे. परंतु सदर कोविड वॉर्ड १५/०७/२०२० पर्यंत चालु होता. मे.क्वालीटी केटरर्स यांची दिनांक ३१/०५/२०२० पर्यंतची र.रु.३,८४,९५०/- ची बिले आदा करण्यात आलेली आहेत. आणि उर्वरीत र.रु.२,५६,१२०/- ची बिले दायगी कामी बाकी आहेत. मुळ ठराव र.रु.८ लाख चे खर्चास मान्यता घेणेत आलेली होती परंतू ठरावा मध्ये दिनांक १३/०६/२०२० पर्यंत नमूद करणेत आले होते. परंतू कामाचे आदेशात दि.१३/०३/२०२० पासुन सदर सुविधा कोरोना वॉर्ड चालु असेपर्यंत पाणी,बिस्कीटे, देणे आवश्यक आहे. असे आदेशीत केलेले आहे. तरी आदेशाप्रमाणे पुढील दि.०१/०६/२०२० ते ०९/०७/२०२० पर्यंतचा खर्च र.रु.२,५६,१२०/- (अक्षरी र.रू.दोन लाख छपन्न हजार एकशे वीस फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३२४ विषय क्रमांक – ३२

दिनांक – ०३/०२/२०२१ विभाग – नगररचना व विकास

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/०६/०६/२०२१, दि.२७/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मौजे थेरगाव येथील स.नं.१०/२ पै सि.स.नं.२०२० पै, २०२३ पै, २०२४ पै,२०२५ पै मधील मंजुर विकास योजनेतील २४ मी. रुंद रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेबाबत मा.आयुक्त यांनी दि.२०/०१/२०२१ रोजी मान्यता दिली. असुन त्यास खाजगी वाटाघाटी समितीने मान्यता दिलेली आहे. सबब मौजे थेरगाव येथील स.नं.१०/२ पै सि.स.नं.२०२० पै,२०२३ पै, २०२४ पै, २०२५ पै. मधिल २४.०० मी. रस्त्याने बाधीत २२५.०० चौ.मी. क्षेत्रासाठी र.रु.७९,२०,०००/- मुल्यांकन रक्कमेस व त्या अनुषंगाने लागणा-या

मुद्रांकशुल्क, नोंदणी फी, वकील फी व इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३२५ विषय क्रमांक – ३३
दिनांक – ०३/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/२७/२०२१, दि.२७/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना व मनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक 10/2020-21 अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रुपये 180/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण 15 पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार पुरवठादारांना अदा कराव्या लागणा-या र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन विषयाच्या सविस्तर तपशिलामध्ये नमुद केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रू.27,13,320/- (अक्षरी र.रू. सत्तावीस लाख तेरा हजार तीनशे वीस फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.हॉटेल बर्ड व्हॅली यांचे बरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३२६ विषय क्रमांक – ३४
दिनांक – ०३/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/२८/२०२१, दि.२७/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना व मनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक 10/2020-21 अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रुपये 180/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण 15 पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा

आदेशानुसार पुरवठादारांना अदा कराव्या लागणा-या र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन प्रस्तावात नमुद केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रू.7,15,320/- (अक्षरी र.रू.सात लाख पंधरा हजार तीनशे वीस फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.बिग ट्री रेस्टॉरंट & बार यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३२७ विषय क्रमांक – ३५
दिनांक – ०३/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/२९/२०२१, दि.२९/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे, राज्य शासन व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे संयुक्त विद्यमाने अण्णासाहेब मगर स्टेडीयम नेहरूनगर येथे 800 खाटांचे विशेष कोवीड हॉस्पीटल दि.1/9/2020 पासून रूग्णसेवेसाठी कार्यान्वित करण्यात आलेले आहे. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडील दि.20/8/2020 चे आदेशानुसार सदर हॉस्पीटलसाठी दैनंदिन येणारा आवर्ती खर्च (ALL CONSUMTION PPE KIT, वीज व पाणी बील, OXYGEN, औषधे, रूग्णांचे खानपान इ. खर्च पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत करावयाचा आहे. वरील कोवीड हॉस्पीटलसाठी रूग्णाचे जेवण व नाष्ट्याचे बील PMRDA यांनी JESS आयडिया प्रा. लि. यांना अदा करणेबाबत कळविले आहे. JESS आयडिय़ा प्रा. लि. यांनी सदर व्यवस्थेपोटी मे.ठक्कर स्टारडम इव्हेन्ट प्रा. लि. यांची नियुक्ती केली असून रूग्णांचे जेवण व नाष्ट्याचे बील मे.ठक्कर स्टारडम इव्हेन्ट प्रा. लि. यांना अदा करणे बाबत कळविले आहे. मे.ठक्कर स्टार डम इव्हेन्ट प्रा. लि. यांनी दि.01/12/2020 ते दि.15/01/2021 या कालावधीतील अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथिल कोवीड हॉस्पीटलमध्ये उपचार घेतलेल्या रूग्णांचे भोजन व्यवस्थेचे बील र.रू.10,78,029/- सादर केले आहे. मे.ठक्कर स्टारडम इव्हेन्ट प्रा.लि. यांनी रूग्ण जेवणापोटी सादर केलेले बील र.रू.10,78,029/- पैकी मनपाने इतर पुरवठाधारकांशी ठरविलेल्या दरानुसार सदर बील प्रति रूग्ण र.रू.180/- या प्रमाणे र.रू.10,78,020/- इतकी बील देय रक्कम होत असून सदर रक्कम अदा करणेस व येणारे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67(3)(क) व अनुसुची ड प्रकरण क्रमांक5(2)(2) नुसार कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३२८ विषय क्रमांक – ३६
दिनांक – ०३/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/३०/२०२१, दि.२९/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना वमनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टाउपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक 10/2020-21 अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रुपये 180/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण 15 पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार पुरवठादारांना अदा कराव्या लागणा-या र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन प्रस्तावात नमुद केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रु.81,89,280/- (अक्षरी र.रू.एक्याऐंशी लाख एकोणनव्वद हजार दोनशे ऐंशी फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.सावित्री महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३२९ विषय क्रमांक – ३७
दिनांक – ०३/०२/२०२१ विभाग – बी.आर.टी.एस.
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.बी.आर.टी.एस.विभाग/१३७/२०२१, दि.२९/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य BRTS विभागामार्फत सांगवी ते किवळे हा BRTS रस्ता विकसित केला असून सदर रस्त्यातील डांगे चौक ते ताथवडे चौका पर्यंतचा रस्ता अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणेचे नियोजित आहे. सदर भाग हा व्यावसायिक व निवासी असून सदर रस्त्यावरती शाळा, कॉलेज, व हॉस्पिटल इ. असल्यामुळे नेहमीच वाहतुकीची व पादचा-यांची घनता जास्त असते म्हणुन सर्वांच्या सोयीसाठी व सुरक्षेसाठी सदर कामामध्ये प्रामुख्याने पदपथ विकसित करणे व इतर अनुषंगिक कामे करावी लागणार आहेत त्यासाठी अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार आवश्यक बाबींचा अंतर्भाव लक्ष्यात घेऊन त्यादृष्टीने नियोजन करणेकामी तांत्रिक दृष्ट्या आवश्यकतेनुसार सर्व बाबींचा एकत्रित विचार करून निर्धारीत मानांकना प्रमाणे नियोजन करणे व स्थापत्य विषयक कामांच्या बाबींचे पुर्वगणपत्रक तयार करणे व निविदा बनविणेसह कामाची देखरेख करणे इ. निविदापुर्व (Pre tender activity) व निविदा पश्चात (post tender activity) कामे करावी लागणार आहेत. त्याकरिता बी.आर.टी.एस. विभागामार्फत मनपा संकेत स्थळावर जाहिर कोटेशन प्रसिध्द करून सदर कामाकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूकीबाबत दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार अनुभवी सल्लागार यांचे दर दि.११/१२/२०२० ते दि.१७/१२/२०२० या कालावधीमध्ये मागविण्यात आले होते, त्यानुसार प्राप्त दरपत्रकामधील नमूद दर सोबत जोडलेल्या तुलनात्मक तक्त्याचे अनुषंगाने

मे.अँश्युअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांचा १.९२% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे.

| अ.क्र. | सल्लागारांचे नाव | एकूण प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|
| १. | विकास इंडिया कन्सल्टिंग | २.०२% | |
| २. | मे.अँश्युअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस | १.९२ % | |
| ३. | एनव्हायरोसेफ कन्सल्टंट | २.० % | |
| ४. | युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेन्ट | २. १ % | |
| ५. | मॅप्स ग्लोबल सिव्हिटेक प्रायवेट लिमिटेड | १.९३% | |
| ६. | श्रीखंडे कन्सल्टंट प्रायवेट लिमिटेड | २.२% | |

त्यानुषंगाने सदर कामासाठी मे.अँश्युअर्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांची नेमणूक करून त्याकामी लागणारी फी ही कमी दराने (१.९२%) प्राप्त झालेली आहे. तरी प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कामाकरिता एकूण १.९९% (०.५०% निविदा पूर्व + १.४२% निविदा पश्चात) यादराने मे.अँश्युअर्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस यास फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३३० | विषय क्रमांक – ३८

दिनांक – ०३/०२/२०२१ | विभाग – अ क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.संतोष कांबळे | अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.अक्षे/स्था/कावि/०८/०२/२०२१, दि.२८/०१/२०२१

विषय - प्रभाग क्रं.१६ आकुर्डी हॉस्पिटलचे विस्तारीकरण करणे (टप्पा २) [ब स्थापत्य विषयक कामे, (क) फर्निचर विषयक कामे] या कामासाठी वास्तूविशारद/ प्रकल्प सल्लागार नेमणूक करणेबाबत.

विषय क्र.३८ चा विचार दि.१७/०२/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३३१ | विषय क्रमांक – ३९

दिनांक – ०३/०२/२०२१ | विभाग – स्थापत्य मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम | अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/ह मुख्य/७६/२०२१, दि.२९/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.94/1/2019-20 अन्वये कासारवाडी भाजीमंडई विकसित करणेकामी नि.र.रू.2,47,69,119/- (अक्षरी र.रु.दोन कोटी सत्तेचाळीस लाख एकोणसत्तर हजार एकशे एकोणीस फक्त) लघुत्तम १ ठेकेदार मे.वैदेही कन्स्ट्रक्शन यांची निविदा, निविदा अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस ठराव क्र.7651 दि.21/10/2020 अन्वये मा.स्थायी समिती सभेने मान्यता दिली आहे. तथापि, मा.आयुक्तसो यांचेकडील आदेश क्र.स्था/नि/इ मुख्य/220/2020 दि.16/12/2020 अन्वये मे.वैदेही कन्स्ट्रक्शन काळया यादीत समाविष्ट करुन सर्व निविदा प्रक्रियेत भाग घेणेस ३ वर्षासाठी प्रतिबंध करणेस आदेश निर्गमित करणेत आले आहे तसेच लघुत्तम २ ठेकेदार लघुत्तम

१ यांचे दरात काम करणेची संमती असल्यास त्यांची निविदा स्वीकृत करणेस मा.आयुक्तसो यांचेकडील दि.16/12/2020 चे प्रस्तावान्वये आदेशित केले आहेत. त्यामुळे मे.वैदही कन्स्ट्रक्शन यांची निविदा रद्द करुन लघुत्तम २ ठेकेदार मे.अशोक कन्स्ट्रक्शन यांनी लघुत्तम १ ठेकेदार यांचे दरात काम करणेस संमती दिली असल्याने लघुत्तम २ ठेकेदार मे.अशोक कन्स्ट्रक्शन याची निविदा मंजूर करणेस प्रस्तावित करणेत येत आहे. नि.क्र.94/1/2019-20 अन्वये कासारवाडी भाजीमंडई विकसित करणेकामी नि.र.रू.2,47,69,119/- (अक्षरी र.रु.दोन कोटी सत्तेचाळीस लाख एकोणसत्तर हजार एकशे एकोणीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.2,46,58,669/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम मे.अशोक कन्स्ट्रक्शन यांचेकडून र.रु.2,46,58,669/- पेक्षा 23.57% कमी म्हणजेच र.रु.1,88,46,621/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,08,942/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,10,450/- = एकुण र.रु.1,90,66,013/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३३२ विषय क्रमांक – ४०
दिनांक – ०३/०२/२०२१ विभाग – मुख्य लेखा परिक्षक
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.मुख्य लेखा परीक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/१अ/कावि/२१/२०२१, दि.२९/०१/२०२१

मा.मुख्य लेखा परीक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०२.११.२०२० ते दि.०३.०१.२०२१ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/१अ/कावि/२१/२०२१ दि.२९/०१/२०२१ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३३३ विषय क्रमांक – ४१
दिनांक – ०३/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/१८/कावि/३६/२०२१, दि.२९/०१/२०२१

विषय - आण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील PMRD Covid Hospital यांनी दिलेल्या मागणीनुसार कोरोना रुग्णांच्या उपचाराकरीता आवश्यक वैद्यकिय ऑक्सिजन द्रव गॅसचा $O_2$ पुरवठा पुरवठा करणेकामी नियुक्त केलेले मे.गॅब एंटरप्रायजेस, पिंपरी यांना मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.४१ चा विचार दि.१०/०२/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८३३४ विषय क्रमांक – ४२
दिनांक – ०३/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/१८/कावि/३७/२०२१, दि.२९/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

कोरोना या विषाणूचा सर्वत्र फैलाव झालेला असल्याने त्याचा प्रार्दुभाव पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये पसरत असल्याने नविन भोसरी रुग्णालयातील क्ष-किरण विभागासाठी तातडीने डार्क रुम तयार करणेकरीता महानगरपालीका अधिनियम कलम(६३)(६), कलम (६७)(३)(क), आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ४१ व ५० शासन खरेदी नियमावली मधील नियम ३.२.६, साथीरोग अधिनियम १८९७ सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन अधिसुचना दिं.१३ मार्च २०२० मधील तरतुद विचारात घेऊन व मनपा वेबसाईटवर प्रसिध्दी केलेले अंदाजित दराकरीता कोटेशन नोटीस ३८/२०२०–२१ प्राप्त लघुत्तम दर विचारात घेऊन में.अरर्थान टेक्नोलोजी व एंटरप्राईजेस, चिंचवड यांनी वरील कोटेशन मधील लघुत्तम दरानुसार तथापी प्रत्यक्ष रुग्णालयातील मागणी विचारात घेऊन आवश्यक व वाढीव साहित्याचा तातडीने पुरवठा केला असल्याने त्यांच्या सदर साहित्याचे बील र.रु.५,०२,६८२/-(अक्षरी र.रू.पाच लाख दोन हजार सहाशे ब्याऐंशी फक्त)चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची प्रकरण ५(२)(२) व कलम (६७)(३)(क), नुसार थेट पध्दतीने खरेदी खर्चास कार्योत्तर मान्यता व त्यांचे बरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३३५ विषय क्रमांक – ४३
दिनांक – ०३/०२/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.विमुका/६/कावि/४८/२०२१, दि.१५/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.31/01-2020/21 अन्वये भक्ती शक्ती चौक येथे ग्रेड सेपरेटर व उडडाणपुलाचे दिवाबत्ती व्यवस्था करणे व विद्युत विषयक कामे करणेकामी मे.सुमी इलेक्ट्रीकल सर्व्हीसेस नि.र.रू.3,99,21,306/- (अक्षरी र.रू.तीन कोटी नव्व्यान्नव लाख एकवीस हजार तीनशे सहा फक्त) पेक्षा 19.10% कमी या दराने ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३३६ विषय क्रमांक – ४४
दिनांक – ०३/०२/२०२१ विभाग – वायसीएमएच, पदव्युत्तर सं.
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/८/कावि/९३/२०२१, दि.२५/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

हॉटेल कलासागर यांचेकडील दि.२९/७/२०२० च्या पत्रान्वये हॉटेल कलासागर प्रशासनाने लॉकडाऊनच्या कालावधीत कोविड रुग्णालयामध्ये काम करणा-या वैद्यकीय अधिकारी/कर्मचा-यांना उपलब्ध करुन दिलेल्या सर्व रुम्स विनामूल्य उपलब्ध करुन देणेचे मान्य केले आहे. तथापि हॉटेल कलासागर प्रशासनाने दि.३ जुलै २०२० रोजी हॉटेल कलासागर निवासस्थान बील र.रु.२०००/- प्रति दिन प्रति रुम + टॅक्स असा दर मिळणेसाठी विनंती केलेली आहे. तत्पुर्वी निवासस्थान दर आकारणीबाबतची माहिती मनपा तथा इकडील कार्यालयास उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे. सदर कालावधीचे बील अदायगी न करता सदर कालावधीत विनामुल्य सेवा हॉटेल कलासागरने उपलब्ध करुन दिली असे ग्राह्य धरुन सदर कालावधीचे दि.१/७/२०२० च्या पत्रान्वये हॉटेल कलासागर प्रशासनाने मागणी केलेप्रमाणे लाईट बील अंदाजे र.रु.१०,००,०००/- (अक्षरी र.रू. दहा लाख फक्त) आहे. तसेच माहे ३ जुलै पासुन कर्मचा-यांचे निवासस्थान बील दि.३/७/२०२० ते दि.२४/१०/२०२० या कालावधीचे बील अदायगी करणे आवश्यक आहे. हॉटेल कलासागर येथे वायसीएम रुग्णालय तथा इतर मनपा रुग्णालयातील खाली नमुद कालावधीत अधिकारी /कर्मचारी यांनी वास्तव्य केले आहे त्याचा तपशील पुढील प्रमाणे –

| अ.क्र. | महिना | एकुण अधिकारी/कर्मचारी | एकुण खोल्या | एकूण दिवस | निवासाचा दर प्रति दिन प्रति खोली | एकुण र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जुलै | ४२ | २१ | ३१ | १००० | ६,५१,००० |
| २ | ऑगष्ट | ३९ | २० | ३१ | १००० | ६,२०,००० |
| ३ | सप्टेंबर | ३८ | १९ | ३० | १००० | ५,७०,००० |
| ४ | ऑक्टोंबर | ३८ | १९ | २४ | १००० | ४,५६,००० |
| एकुण | | **१५७** | **७९** | **११६** | **१०००** | २२,९७,०००/- |

उपरोक्त प्रमाणे कोरोना विषाणु सनियंत्रण कक्ष तहसिल कार्यालय पुणे शहर यांचेकडील पत्र क्र.कोसक/३५९/२०२०, दि.१९/६/२०२० अन्वये मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडुन अधिग्रहण केलेल्या हॉटेल दर निश्चीत करणेत आलेला आहे. Single रुमचा र.रु.१०००/- दर निर्धारीत करुन ससून सर्वोपचार रुग्णालयाने याप्रमाणे अदायगी केलेली आहे. हॉटेल कलासागरने सादर केलेले इलेक्ट्रीसीटी बिल माहे एप्रिल र.रू.१५,४९,४६०/-, माहे मे र.रू.१८,५०,८४०/- व माहे जून र.रू.२१,५५,३९०/- असे असून सदरच्या बिलांमधून मनपाने र.रू.१०,००,०००/-(अक्षरी र.रू.दहा लाख फक्त) हॉटेल कलासागर यांना अदा करावा अशी मागणी केलेली आहे. तसेच निवास्थान बिल दि.३/७/२०२० ते दि.२४/१०/२०२० या कालावधिचे र.रु.२२,९७,०००/- (अक्षरी र.रू.बावीस लाख सत्यान्नव हजार फक्त) इतके असे एकुण र.रू.३२,९७,०००/- (अक्षरी र.रू.बत्तीस लाख सत्यान्नव हजार फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ८३३७ विषय क्रमांक – ४५
दिनांक – ०३/०२/२०२१ विभाग – पाणीपुरवठा प्रकल्प
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भा.आ./पापु प्रकल्प/अ-१/२७/२०२१, दि.०२/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

शासन निर्णय क्र.बिसिंआ २०१८/(३९१/१८)/सिं.व्य.(धो) मंत्रालय, मुंबई-४०००३२, २४/१०/२०१८ व शुद्धीपत्रक शासन निर्णय क्र.बिसिंआ २०१८/(३९१/१८)/सिं.व्य.(धो.)मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि.१३/११/२०१८ नुसार आंद्रा धरणातून ३६.८७ द.ल.घ.मी. इतका पाणी कोटा पिंपरी चिंचवड शहरासाठी शासनाने मंजूर केलेला आहे. सदर अशुध्द पाणी इंद्रायणी नदीतून मौजे निघोजे-तळवडे येथून उपसा करणेस मुख्य अभियंता जलसंपदा विभाग यांनी पत्र मुअ(जसं)/काअ-२/(४४/२०१८)/ प्रशा-८/क्र.४७४८, दि.०४/११/२०२० नुसार उदभव बदल करणेस मान्यता दिलेली आहे. सदर कामाच्या अंतर्गत मौजे निघोजे तळवडे येथून पाणी उपसा करणेकामी मौजे तळवडे येथील सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कमधील रस्त्यामधून १२५० मि.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेकामी म.औ.वि.म. यांचेकडे रस्ता खोदाई करणेकामी महानगरपालिकेमार्फत विनंती अर्ज करणेत आला होता. सदर अर्जास अनुसरुन कार्यकारी अभियंता, म.औ.वि.म. (माहिती व तंत्रज्ञान विभाग पुणे-३) यांनी त्यांचे क्षेत्रातील रस्ता खोदाई करणेकामी शुल्क र.रु.१,८७,०६,३५०/- व र.रु.१०,००,०००/- सुरक्षा ठेव असे एकूण र.रु.१,९७,०६,३५०/- इतकी रक्कम डिमांड ड्रॉफ्टद्वारे कार्यकारी अभियंता, म.औ.वि.म. (माहिती व तंत्रज्ञान विभाग, पुणे-३) यांचे नावाने जमा करणेबाबत कळविले आहे. तरी सदर खर्च करणेकामी सन २०२०-२१ च्या मूळ अंदाजपत्रकात पान क्र. २३९ वर अ.क्र. ५-इ (i) आंद्रा व भामा आसखेड प्रकल्पांतर्गत चिखली येथे उभारायच्या जलशुद्धीकरण केंद्रासाठी देहू येथून नदीतून जलउपसा करून पाईप लाईनद्वारे पाणी आणणे व इतर तदअनुषंगिक कामे करणे या कामांतर्गत देहू येथील (बोडकेवाडी बंधारा) येथून जलशुद्धीकरण केंद्र चिखली पर्यंत मुख्य जलवाहिनी टाकणे. या लेखाशिर्षांतर्गत र.रु.२२,००,००,०००/- इतकी तरतूद उपलब्ध आहे. सदरचा खर्च प्रस्तुत कामातून करता येईल त्याकामी मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. तरी कार्यकारी अभियंता, म.औ.वि.म. (माहिती व तंत्रज्ञान विभाग, पुणे-३) यांना र.रु.१,९७,०६,३५०/- (अक्षरी र.रू.एक कोटी सत्यान्नव लाख सहा हजार तीनशे पन्नास फक्त) रस्ता खोदाई शुल्क अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३३८ विषय क्रमांक – ४६

दिनांक – ०३/०२/२०२१ विभाग – बी.आर.टी.एस.

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.बीआरटीएस विभाग/१३८/२०२१, दि.२९/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य BRTS विभागामार्फत सांगवी ते किवळे हा BRTS रस्ता विकसित केला असून सदर रस्त्यातील जगताप डेअरी ते कावेरीनगर सबवे पर्यंतचा रस्ता अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणेचे नियोजित आहे. सदर भाग हा व्यावसायिक व निवासी असून सदर रस्त्यावरती शाळा, कॉलेज, व हॉस्पिटल इ. असल्यामुळे नेहमीच वाहतुकीची व पादचा-यांची घनता जास्त असते म्हणुन सर्वांच्या सोयीसाठी व सुरक्षेसाठी सदर कामामध्ये प्रामुख्याने पदपथ विकसित करणे व इतर अनुषंगिक कामे करावी लागणार आहेत त्यासाठी अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार आवश्यक बाबींचा अंतर्भाव लक्ष्यात घेऊन त्या दृष्टीने नियोजन करणेकामी तांत्रिक दृष्ट्या आवश्यकतेनुसार सर्व बाबींचा एकत्रित विचार करून निर्धारीत मानांकना प्रमाणे नियोजन करणे व स्थापत्य विषयक कामांच्या बाबींचे पुर्वगणपत्रक तयार करणे व निविदा बनविणेसह कामाची देखरेख करणे इ. निविदापुर्व (Pre tender activity) व निविदा पश्र्चात (post tender activity) कामे करावी लागणार आहेत. त्याकरिता बी.आर.टी.एस. विभागामार्फत मनपा संकेतस्थळावर जाहिर कोटेशन प्रसिध्द करून सदर कामाकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूकीबाबत दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार अनुभवी सल्लागार यांचे दर दि.११/१२/२०२० ते दि.१७/१२/२०२० या कालावधीमध्ये मागविण्यात आले होते,त्या नुसार प्राप्त दरपत्रकामधील नमूद दर सोबत जोडलेल्या तुलनात्मक तक्त्याचे अनुषंगाने मे.अँश्युअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांचा १.९३% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे.

| अ.क्र. | सल्लागारांचे नाव | एकूण प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|
| १. | विकास इंडिया कन्सल्टिंग | २.०३% | |
| २. | श्रीखंडे कन्सल्टंट प्रायवेट लिमिटेड | २.२% | |
| ३. | मे.अॅश्युअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस | १.९३% | |
| ४. | मॅप्स ग्लोबल सिव्हिटेक प्रायवेट लिमिटेड | १.९४% | |
| ५. | एनव्हायरोसेफ कन्सल्टंट | २.०% | |
| ६. | युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेन्ट | २.४% | |

त्यानुषंगाने सदर कामासाठी मे.अॅश्युअर्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांची नेमणूक करून त्याकामी लागणारी फी ही कमी दराने (१.९३%) प्राप्त झालेली आहे. तरी प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कामाकरिता एकूण १.९३% (०.५०% निविदा पूर्व + १.४३% निविदा पश्चात) यादराने मे.अॅश्युअर्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस यास फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३३९ विषय क्रमांक – ४७

दिनांक – ०३/०२/२०२१ विभाग – बी.आर.टी.एस., स्थापत्य

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/६७/२०२१, दि.१९/०१/२०२१

२) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/१७५/२०२१, दि.०३/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

स्थापत्य बीआरटीएस विभागामार्फत काळेवाडी फाटा ते देहु आळंदी रस्त्या पर्यंतचा रस्ता विकसित करणेत आला आहे. या रस्त्यामधील चौकात काळेवाडी एम.एम. स्कुल चौकात श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारीत संकल्प चित्र व इ. पद्धतीने सुशोभिकरण करणेकामी मा.स्थानिक नगरसदस्य यांनी इकडील विभागाकडे केली आहे. त्यानुसार मनपाचे सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकात विशेष योजना या लेखाशिर्षाअंतर्गत पान क्र.५८ अ.क्र.१३४ वर र.रु.६,९२,०००/- इतकी तरतुद करणेत आलेली आहे. मा.महापालिका सभा समिती ठराव क्र.५५३ दि.०४/०६/२०२० अन्वये वरील कामास र.रु.५,००,००,०००/- इतकी प्रशासकिय मान्यता मिळालेली आहे. सदर ठिकाणी श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारीत संकल्प चित्र व इ. पद्धतीने सुशोभिकरण करणेकामी वास्तुविशारद (आर्किटेक्ट) नेमणुक करणेसाठी मनपा वेबसाईटवर कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन दर मागविणेत आले होते. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

**तुलनात्मक दर पत्रक (Compretive Stetamant)**

| अ.क्र. | वास्तुविशारद (आर्किटेक्ट)नाव | प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.किमया | १.९८% | L1 |
| २ | मे.किमया असोसिएट्स आर्किटेक्ट प्लॅनर्स | २.५% | L2 |
| ३ | मे.सोल्स स्पेस | २.५५% | L3 |

वरील तुलनात्मक तक्त्यानुसार मे.किमया यांचा १.९८% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. सदर परिसराचे नियोजन करुन आराखडे तयार करणे, सुशोभिकरणाचे बाबींचे दरपृथ्थकरण करणे व त्यानुसार पुर्वगणक पत्रक करणे व निविदा बनविणे इ. (Pretender) व निविदापश्चात (Post Tender) इ. कामे करावी लागणार आहेत. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील शासन निर्णयनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क व त्यांच्या प्रदानाबाबत मार्गदर्शक सुचनांनुसार शासन निर्णय संकीर्ण २०१८/प्र.क्र.५४/नावि/-१६ अन्वये टप्पे विहित करणेत आले आहेत. याप्रमाणे सदर कामासाठी सल्लागारास प्रकल्प व्यवस्थापनासाठी खालील प्रमाणे टप्पे विहित करुन, फी अदा करणेत येईल.

| अ.क्र. | प्रकल्पाच्या/कामाच्या प्रगतीचा टप्पा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्काचे प्रदानाचे प्रमाण (प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात) | | |
|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रकल्पासाठी | इतर सर्व कामांसाठी | प्राप्त कोटेशन नुसार देय रक्कम |
| १ | प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर | ०७५%(डीपीआर ०.५०%+ प्र.मा.-०.२५%) | ०.५० (डीपीआर०.३३% +प्रमा-०.१७%) | ०.४८ (डीपीआर०.३१% +प्रमा-०.१७%) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | प्रकल्पातील कामाचे कार्यादेश दिल्यानंतर | ०.२५% | ०.१६ | ०.१६ |
| ३ | प्रकल्पाचे २५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४०% | ०.२७ | ०.२७ |
| ४ | प्रकल्पाचे ५० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४०% | ०.२७ | ०.२७ |
| ५ | प्रकल्पाचे ७५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.४० | ०.४० |
| ६ | प्रकल्पाचे १०० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.४० | ०.४० |
| | **एकुण** | ३.००% | २.००% | १.९८% |

मे.किमया यांनी सादर केलेले दर हे शासनाने ठरवुन दिलेल्या दरापेक्षा कमी आहे. त्यामुळे मे.किमया यांची यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणुक करणेस व महाराष्ट्र शासन निर्णय संकीर्ण २०१८/प्र.क्र.५४/नावि/-१६ अन्वये निविदा स्विकृत रक्कमेच्या १.९८% फी मे.किमया यांना निविदापुर्व (Pre tender) व निविदापश्चात (Post Tender) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३४० विषय क्रमांक – ४८

दिनांक – ०३/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडील विकास कामांकरिता वास्तू विशारद व प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून मे.बेरी बिल्टस्पेस डिझाईन्स प्रा. लि. पुणे यांची महापालिकेच्या पॅनेलवर नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३४१ विषय क्रमांक – ४९

दिनांक – ०३/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

महाराष्ट्र शासन यांचेकडील पीसीसी/3009/संक्र 233 प्र.क्र.369/10 नवि 22 दि.06/08/2010 आदेशान्वये र.रू.25,00,000/- इतके अनुदान कन्या विद्यालय, देहू यांना देण्यास मान्यता दिलेली आहे. अद्यापपर्यंत कन्या विद्यालय देहू यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे अनुदानापोटी र.रू.10,00,000/- (अक्षरी र.रू.दहा लाख फक्त) अदा करणेत आलेले आहे. तर उर्वरीत र.रू.15,00,000/- लाख अदा करणे बाकी आहे. कन्या विद्यालय देहू या विद्यालयाचे नावा ऐवजी संत जिजाबाई कन्या विद्यालय, देहू असा बदल झाला आहे. तरी नावात बदल झाल्याने संत जिजाबाई कन्या विद्यालय, देहू यांना उर्वरीत अनुदानापोटी र.रू.15,00,000/- देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३४२ विषय क्रमांक – ५०

दिनांक – ०३/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

मा.महापालिका सभा ठराव क्र.३२९ दि.२०/१/२०२८ अन्वये प्रभाग क्र.२७ रहाटणी येथे श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांचा अस्तित्वातील अर्धाकृती पुतळा हटवून त्याठिकाणी श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांचा नविन अश्र्वारूढ पुतळा बसविणे बाबत ठराव मंजूर झालेला आहे सदर विषयांकित कामांसाठी मनपाचे आर्किटेक्ट पॅनेलवरील मान्यता प्राप्त आर्किटेक्ट मे.सृष्टी डिझायनर प्रो.प्रा. आर्कि. गिपीष चिद्दरवार यांची वास्तुविशारद म्हणून खालील मनपा दराने नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष/कामाचे नाव | लेखाशिर्ष | वास्तुविशारद | दर | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | निविदा पुर्व | निविदा पश्चात | |
| १ | प्रभाग क्र.२७ रहाटणी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवाजी महाराज यांचा अश्र्वारूठ पुतळा अभारणे व अनुषंगिक कामे करणे | विशेष योजना | मे.सृष्टी डिझायनर (प्रो.प्रा. आर्कि. गिरीष चिद्दरवार) | ०.९० | ०.६० | १.५० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३४३ विषय क्रमांक – ५१

दिनांक – ०३/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

मा.महानगरपालिका आयुक्त यांची शिफारस (पत्र क्र.नावियो/२ का वि/४२३/२०१९) मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.१५ दि.२६/१२/२०१९ अन्वये तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र.६२९५ दि.०८/०१/२०२० लक्षात घेवून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभाग आणि मे.लाईट हाऊस कम्युनिटी फाऊंडेशन (पुर्वीचे नाव सिटी कनेक्ट डेव्हल्पमेंट फाऊंडेशन) यांच्या संयुक्त विद्यमाने पालिकेच्या क्षेत्रिय कार्यालयाच्या हद्दीमध्ये जागांच्या उपलब्धतेनुसार मनपा हद्दीतील १८ ते ३० वयोगटातील युवर युवती साठी Light House रोजगार निर्मितीचा प्रकल्प राबविणेस तसेच या प्रकल्पाकरिता मुलभूत सोयी सुविधा उदा.जागा, संगणक संच इ. विनामुल्य महापालिकेमार्फत उपलब्ध करून देण्यास तसेच मे.लाईट हाऊस कम्युनिटी फाऊंडेशन यांनी या प्रकल्पांतर्गत सहभागी होणा-या लाभार्थी मधील १८ ते ३० वयोगटातील महिला मुले मुली यांना मोफत प्रशिक्षण देवून रोजगार उपलब्ध करून देण्यास व त्याकरिता आवश्यक मनुष्यबळ व अनुषंगिक खर्च त्यांनी CSR (Corporate Spcial Responsibility) च्या माध्यमातून उभारून प्रकल्प कार्यान्वीत करण्यास तसेच साबित्रीबाई फुले इमारतीमधील दुस-या मजल्यावरील एक हॉल साधारण पणे २०.४२ मी. X ८.९९ मी. जागा, संगणक व अनुषंगिक बाबी इत्यादी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा मनपा मार्फत मोफत उपलब्ध करून देवून एक Light House प्रकल्प किमान ३ वर्ष कालावधीकरिता सुरू करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८३४४ विषय क्रमांक – ५२

दिनांक – ०३/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

प्रशासकिय पुर्नरचना कमिटीच्या शिफारशी प्रमाणे "अत्युत्कृष्ट" काम करणा-या शासकिय कर्मचा-यांना आगाऊ वेतनवाढ दिली जाते त्याप्रमाणे महापालिका सभेने ठराव क्र.५४४ दि.२३/११/१९८७ अन्वये महापालिका कर्मचा-यांना आगाऊ वेतनवाढ देण्याचे धोरण ठरविले. प्रशासनाचे आदेश क्र.प्रशा/१३/कावि/४२२/२००८ दि.२२/९/२००८ नुसार परिशिष्ट "अ" मधील अधिकारी व कर्मचारी यांना एक वेतनवाढ व परिशिष्ट "ब" येथील अधिकारी व कर्मचारी यांना २ वेतनवाढ दि.०१/१०/२००८ पासून आगाऊ वेतनवाढ त्यांचे नियमित वेतनवाढीचे दिनांकात कसलाही बदल न करता मंजूर करण्यात आली व तसे अमलातही आली. सदर आदेशानव्ये श्री.इंदलकर चंद्रकांत पोपट, श्री.घुबे संजय श्रीकृष्ण, श्रीम.प्रेरणा सिनकर, श्री.खडतरे संदेश शामसुंदर यांना २ वेतनवाढ व श्री.वाघमारे सतिश बाबासाहेब, श्री.साबळे भाऊसाहेब रामभाऊ यांना १ वेतनवाढ मंजूर करण्यात आली होती व देण्यात आली होती परंतु ६ व्या वेतनवाढ आयोग लागू झाल्यावर वेतननिश्चिती या २ वेतनवाढ रद्द करून करणेत आल्या व ते वसुल करण्यात आले याबाबत १६ जुलै २०१९ रोजी दत्तात्रय भुजंगराव देशपांडे विरूध्द महाराष्ट्र राज्य शासन (८४६२/२०१९) च्या मुंबई उच्च न्यायालय यांच्या औरंगाबाद बॅंचने "If petitioners are already granted certificate of excellent work in the year 2007, 2008 and 2009 then same cannot be withdrawn retrospectively on the basis of subsequent Government Resolution" असा निकाल दिला आहे. सदर निकाल विचारात घेवून २००८ च्या आदेशात नमूद केलेल्या कर्मचारी श्री.इंदलकर चंद्रकांत पोपट, श्री.घुबे संजय श्रीकृष्ण, श्रीम.प्रेरणा सिनकर, श्री.खडतरे संदेश शामसुंदर यांना दोन वेतनवाढ श्री.वाघमारे सतिश बाबासाहेब श्री.साबळे भाऊसाहेब रामभाऊ यांना १ वेतनवाढ याप्रमाणे त्यांनी केलेल्या "अत्युत्कृष्ट" सेवेसाठी देणेत आलेली वेतनवाढ कायदा विभागाचा सल्ला घेवून पूर्वलक्षीप्रभावाने फरकासह लागू करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता अंमलबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३४५ विषय क्रमांक – ५३

दिनांक – ०३/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

सांगवी – किवळे रस्त्यावरील फुटपाथचे काम अर्बन स्ट्रीटनुसार करणे आवश्यक आहे, याकरीता मे.अँश्युअर्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस पुणे यांची सांगवी – किवळे रस्त्यावरील डांगे चौक ते कावेरीनगर सबवे पर्यंतचा रस्ता अर्बन स्ट्रीटनुसार विकसीत करणेकामी तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणुक करून त्याकामी लागणारी फी हि १.९३% अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे. सदर कामाकरीता एकूण १.९३% (०.५०% निविदापुर्व + १.४३% निविदा पश्चात) या दराने मे.अँश्युअर्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस पुणे यांना फी अदा करणेत मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८३४६ विषय क्रमांक – ५४

दिनांक – ०३/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात मे. वेदांत एंटरप्राइजेस या जाहिरात संस्थेस खाली नमुद केलेल्या ठिकाणी करारनामा करून सात वर्ष कालावधीसाठी जाहिरात होर्डिंग्ज उभारण्यासाठी मान्यता देणेत येत आहे.

१) निगडी भक्ती शक्ती चौक येथे दर्शनी दोन्ही बाजूला

२) कुदळवाडी उड्डाणपुलाच्या दर्शनी बाजूला

३) चिंचवड महावीर चौक व पिंपरी पोलीस स्टेशनच्या मधील जागेवर दर्शनी बाजूला

४) स्पाईन रोड सरदार वल्लभभाई पटेल चौक येथील दर्शनी दोन्ही बाजूला

५) स्पाईन रोड स्पाईन सिटी मॉल समोरच्या दर्शनी बाजूला

६) CNG पंपाजवळ कै.अंकुश बो-हाडे चौक मोशी रोड येथील दर्शनी बाजूला

७) मोशी रोडवरील मातेरे हाऊस चौक येथील दर्शनी बाजूला

८) धर्मवीर संभाजी महाराज चौक, गोल्डफिल्ड मॉलजवळ दर्शनी बाजूला

९) कै.मधुकर पवळे उड्डाणपुलाजवळ दर्शनी बाजूला

१०) शंकेश्वर सोसायटीजवळ शिवरोड मोशी येथे दर्शनी बाजूला

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३४७ विषय क्रमांक – ५५

दिनांक – ०३/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

शांताई एन्टरप्रायझेस या जाहिरात संस्थेस खालील नमूद केलेल्या ठिकाणी जाहिरात फलक (होर्डिंग्ज) उभारण्यासाठी मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | ठिकाण | मोजमाप |
|---|---|---|
| १ | लोकमान्य हटस्पीटल चिंचवड समोरील मोकळ्या जागेत | २० X २० |
| २ | निगडी मधूकर पवळे ब्रीज लगत | २० X २० |
| ३ | पी.सी.एम.टी. चौक चिंचवड बस स्टॉप इमारती लगत | २० X २० |
| ४ | बिर्ला हटस्पीटल शेजारील थेरगाव नदी लगत | २० X २० |
| ५ | राजीव गांधी ब्रज लगत पिंपरी क्रॉमा बिल्डींग लगत पार्तिंग मध्ये | २० X २० |
| ६ | वाकड स्मशानभूमि लगत मोकळ्या जागेमध्ये | २० X २० |
| ७ | स्टॉप १८ समोरील बाजूस जगताप डेअरी चौक | २० X २० |
| ८ | पिंपळे सौदागर हॉटेल स्वराज गार्डन लगतची जागा | २० X २० |
| ९ | दापोडी नदी शेजारील मोकळी जागा | २० X २० |
| १० | सावित्रिबाई फुले इयान कस्पटे वस्ती लगत वाकड रोड | २० X २० |

सदर जाहिरीतीचे मंजूर आकारमाण व दरानुसार होणारी जाहिरात पोटीचे भाडे रक्कम अधिक शासनास व मनपास देय असणारी सर्व प्रकारच्या कराची रक्कम देण्यास व करारनामा करून ५ वर्ष कालावधीसाठी व नमूद जागांवर जाहिरात प्रसिध्दीचे हक्क शांताई

एन्टरप्रायझेस यांना देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३४८ विषय क्रमांक – ५६

दिनांक – ०३/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने प्रभाग क्र.२० मध्ये जिजाऊ सांस्कृतिक भवनामधील हॉल हा महिला/पुरुष व्यायामशाळेसाठी हनुमान जिम स्पोर्ट अकेडमी, चिखली यांना सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३४९ विषय क्रमांक – ५७

दिनांक – ०३/०२/२०२१

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.शशिकांत कदम, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव –

शिल्पी आर्किटेक्ट तर्फे पारस नेत्रपावकर व वैष्णवी कन्सल्टंट यांना चालू असलेल्या कामात हलगर्जिपणा व कामाचा सुमार दर्जा पहाता त्यांना ३ वर्ष काळ्या यादीत टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३५० विषय क्रमांक – ५८

दिनांक – ०३/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड शहरामधून पर्यटन अथवा कामानिमित्त परदेशी जाऊन आलेल नागरीक व पिंपरी चिंचवड शहरामध्ये कामानिमित्त किंवा नातेवाईकांकडे आलेले परदेशी नागरिक यांना १४ दिवस देखरेखीखाली (Home Quarantine) करणेकामी सूचना दिलेल्या होत्या त्यानुसार जम्बो कोविड सेंटर नेहरूनगर, ऑटो क्लस्टर कोविड सेंटर, घरकुल कोविड सेंटर, मोशी से.४ वस्तीगृह, बालेवाडी कोविड सेंटर, म्हाळुंगे कोविड सेंटर, भोसरी नविन रूग्णालय, बालनगरी असे कोविड केअर सेंटर (सीसीसी) कार्यान्वित होते. सदरील कोविड केअर सेंटर वर एकूण ५७ रखवालदारांचे मदतनीस दि.३१/१०/२०२० ते ३१/१२/२०२० रोजी पर्यंत नियुक्ती करणेत आलेले होते. सदर रखवालदारांचे मदतनीस त्यांची मुदत दि.३१/१२/२०२० रोजी संपुष्ठात आलेली आहे. कोरोना विषाणू (कोविड १९) चा प्रादुर्भाव आटोक्यात आले असलेने सध्या कोविड सेंटरवर रूग्ण संख्या कमी आहे परंतु नजिकच्या काळात कोरोना विषाणू (कोविड १९) चा प्रादुर्भाव उद्भवल्यास कोविड सेंटर सुस्थितीत असणे आवश्यक आहे व तसेच बंद असलेले कोविड सेंटरमध्ये

रूग्णासाठी अत्यावश्यक वस्तू असून (व्हेंटीलेटर, मेडिकल अधुनिक साधने, बेड, गाद्या इ.) कोविड सेंटर जवळ झोपडपट्टी असल्याने कोविड सेंटर वरील वस्तु चोरीला जायची शक्यता नाकारता येत नसल्याने कोविड केअर (सीसीसी) सेंटर वरील सुरक्षा व्यवस्था अत्यावश्यक आहे तरी सुरक्षा विभागामार्फत कार्यरत असणारी मे.नॅशनल सिक्युरीटी सर्व्हिसेस यांचेकडून दि.०१/०१/२०२१ पासून ते कोविड केअर सेंटर बंद होवून पुढील आदेश येईपर्यंत चालू ठेवण्यास व कोविड केअर सेंटर वरील नियुक्त ५७ रखवालदारांचे मदतनीस यांचे येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३५१ विषय क्रमांक – ५९

दिनांक – ०३/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

पिं.चिं.म.न.पा. मार्फत मा.महापौर यांना वापराकरीता पुरविणेत आलेले वाहन जुने झालेले असल्याने त्यांना शासकीय दराने जेम पोर्टल च्या दरानुसार मे.टोयाटो किर्लोस्कर मोटार प्रा. लि. या उत्पादित कंपनीकडून थेट पद्धतीने करारनामा न करता र.रू.20,00,000/- (अक्षरी र.रू.वीस लाख फक्त) तसेच सदर वाहनास जादा सुविधा या वाहन उत्पादित कंपनीचे अधिकृत विक्रेते यांच्याकडून बसविण्यास व प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३५२ विषय क्रमांक – ६०

दिनांक – ०३/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत नगरसदस्यांचा अभ्यास दौरा माहे मार्च -2021 मध्ये जम्मू व काश्मिर येथे आयोजित करावयाचा आहे. सदरचे अभ्यास दौ-यामध्ये शहर स्वच्छता, कचरा विल्हेवाट शाळांमधील स्वच्छता प्रकल्प, पर्यटन स्थळावरील स्वच्छता नियोजन इ. बाबत भेटी द्यावयाच्या आहेत. सदर दौ-यासाठी मा.सदस्य/सदस्या व क प्रभागातील ४ अधिकारी/ कर्मचारी यांचेसाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा.क प्रभाग समितीचे मासिक सभेमध्ये ठराव क्र.21 दिनांक 02/02/2021 अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. तरी सदरचे अभ्यास दौ-यास येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३५३ विषय क्रमांक – ६१

दिनांक – ०३/०२/२०२१

सुचक – मा.मयूर कलाटे अनुमोदक – मा.पंकज भालेकर

संदर्भ – मा.मयुर कलाटे, मा.पंकज भालेकर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत विविध विकास कामे करण्यात येतात काही वैशिष्टपुर्म कामांसाठी मनपाकडून त्या विषयातील तज्ञांची वास्तूविशारद सल्लगार (आर्किटेक्ट) त्या कामाचा आराखडा करण्यासाठी नियुक्ती करण्यात येते यासाठी मनपाचे वास्तुविशारदांचे (आर्किटेक्ट) पॅनेल तयार केले आहे. त्या पँनेलमध्ये ORIGIN ASSOCIATES INDIA LLP या वास्तुविशारद (आर्किटेक्ट) संस्थेची नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३५४ विषय क्रमांक – ६२

दिनांक – ०३/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिके तर्फे चिंचवड येथे तालेरा रुग्णालयाची जुनी इमारत पाडुन नविन इमारतीचे विस्तारिकरण करणेचे बांधकाम चालू असून अधिक विद्युत भाराची आवश्यकता आहे. त्यासाठी म.रा.वि.वि.कं.स र.रू.३०,१७,४१०/- इतकी अदा करावी लागणार आहे. त्यासाठी मा.स्थायी समिती ठराव क्र.७२१७ दि.१०/०७/२०२० मध्ये नजर चुकीने विद्युत मुख्य कार्यालय विभागाचे स्ट्रीट लाईट लेखाशिर्षकावर खर्चाचे अवलोकन होणे या विषयास मान्यता मिळाली आहे. तरी सदर ठरावामध्ये विद्युत मुख्य कार्यालय विभागाचे स्ट्रीट लाईट ऐवजी म.रा.वि.वि.कं.लि./महापारेषण/त्रयस्थ संस्थाकरिता सुपरविजन चार्जेस व विद्युत निरीक्षण फी अदा करणे या लेखाशिर्षावर खर्चाचे अवलोकन ऐवजी खर्चास मान्यता मिळणे अशी दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

**खालील प्रमाणे सूचना मांडणेत आली**

सूचक- मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२०६ सोमवार दि. ०८/०२/२०२१ रोजी दुपारी २.३० वाजे पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

-----------

सभापती - सोमवार दि.०८/०२/२०२१ रोजी दुपारी २.३० वाजे पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती,** स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – २०६**

(सभावृत्तांत)

(दि.०३/०२/२०२१ ची तहकूब सभा)

**दिनांक – ०८/०२/२०२१** **वेळ – दु.०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.०३/०२/२०२१ ची तहकूब सभा सोमवार दिनांक **०८/०२/२०२१** रोजी **दु.०२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
४. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
५. मा.कलाटे मयूर पांडुरंग
६. मा.कलाटे राहुल तानाजी
७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८. मा.कदम शशिकांत गणपत
९. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०. मा.संतोष बबन कांबळे
११. मा.अभिषेक गोविंद बारणे
१२. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१३. मा.फुगे भिमाबाई पोपट
१४. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर - आयुक्त, मा.अजित पवार – अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चितळे, मा.लोणकर, मा.खोत – उप आयुक्त, मा.खाबडे – सह शहर अभियंता, मा.दांगट, मा.शिंदे – सहाय्यक आयुक्त, मा.डॉ.सावळे – अति. आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठता YCMH, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.गलबले, मा.देशमुख – कार्यकारी अभियंता, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.गोफणे – आरोग्य अधिकारी, हे अधिकारी उपस्थित होते.

-----------

ठराव क्रमांक – ८३५५ विषय क्रमांक – ०८

दिनांक – ०८/०२/२०२१ विभाग – आरोग्य मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/३/कावि/२४८/२०२०, दि.३१/१२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID 19) प्रादुर्भाव लक्षात घेता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अस्तित्वात असलेल्या कोविड केअर सेंटर(CCC) खाजगी रुग्णालय सेंटर/ एन.जी.ओ./खाजगी संस्था यांना खाजगी ठिकाणी (CCC) चालविणेस देणेकामी Expression of Interst (EOI)5/2020-21 प्रसिध्द करणेत आले होते, त्यानुसार ए कॅटेगरी अंतर्गत कामाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | बेड संख्या | स्थळ | मंजुर दर प्रति बेड/ प्रति दिवस | अंदाजित र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १. | साई हॉस्पीटल, आकुर्डी, पुणे | ३०० | समीर लॉन्स, रावेत | १२१९/- | ३,२९,१३,०००/- |

त्यानुसार उपरोक्त तक्त्यात नमूद संस्थेस कोविड१९ या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव लक्षात घेता कोविड केअर सेंटर तातडीने सुरु करणेस मंजूर दराने कामाचा आदेश देणेत आला असून, प्रति बेड/प्रति दिवस मंजुर दरानुसार तीन महिने कालावधी करीता उपरोक्त नमुद अंदाजपत्रकीय रकमेसह प्रत्यक्ष होणा-या खर्चास तसेच त्यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

**अनुकुल – १३** **प्रतिकुल - ०१**

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३५६ विषय क्रमांक – ११

दिनांक – ०८/०२/२०२१ विभाग – वैद्यकिय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मसाभां/२/कावि/१३/२०२१, दि.१५/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांची शिफारस विचारात घेवून –

मे.रुबी एल केअर सर्व्हीसेस या संस्थेस कोविड केअर सेंटर सुरु करणेकामी बालनगरी, भोसरी हे ठिकाण सदर संस्थेस देण्यात आलेले आहे. प्राप्त मंजूर दरानुसार तीन महिने कालावधी करीता अंदाजपत्रकीय र.रु.३,०६,००,०००/- इतकी येत आहे. त्यानुसार क्र.आमुका/०३/कावि/२६४/२०२० दि.०३/०९/२०२० अन्वये सदर कामाचा आदेश देणेत आलेला होते.दि.२२/१०/२०२० रोजी सदर कामाचा करारनामा करणेत आलेला आहे. सदर कामाच्या आदेशाची मुदत दिनांक ०२.१२.२०२० पर्यंत होती. परंतू सध्या कोरोना रुग्ण कमी प्रमाणात आढळुन येत असल्याने मे.रुबी एलकेअर सर्व्हीसेस यांना पुढील दोन महीन्यासाठी मुदतवाढ देणकामीएकूण र.रु.१,८०,००,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी ऐंशी लाख फक्त) अंदाजीत खर्च आहे. EOI ०३/२०२०-२१ मधील अटी शर्तीशी संलग्न राहून करारनामा करुन घेऊन सदर खर्चास मान्यता देणेची मा.अति.आयुक्त(२) यांची मागणी असली तरी, सदर प्रस्तावामध्ये मे.रूबी एल केअर सर्व्हिसेस या संस्थेस कोविड केअर सेंटर, बालनगरी भोसरी या ठिकाणी ४०० खाटांसाठी

मुदतवाढ देणेऐवजी १०० खाटांसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३५७ विषय क्रमांक – १२

दिनांक – ०८/०२/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/२२/२०२१, दि.२२/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अस्तित्वात असलेल्या कोविड केअर सेंटर (CCC) खाजगी रुग्णालय सेंटर/एन.जी.ओ/खाजगी संस्था यांना चालविणेस देणेकामी तसेच खाजगी ठिकाणी वरील संस्थांमार्फत (CCC) चालविणेस देणेबाबत. Expression Of Interest (EOI) क्र.०३/२०२०-२१ आणि ०५/२०२०-२१ अन्वये प्रसीध्द करणेत आलेले होते. ए/बी/सी कॅटेगिरी मधील बेडचे संख्येनुसार दर मागविणेत आलेले होते. त्या प्रमाणे ए कॅंटेगिरी मध्ये सर्व संस्था /हॉस्पीटल यांचे घेणेत आलेले असुन महानगरपालिका फक्त त्यांना भाडे देणार होते. सर्व EOI ९० दिवसांसाठी प्रसीध्द करणेत आलेले होते तसेच सर्वांना कामाचे आदेश ९० दिवसांसाठी देणेत आलेले होते. परंतु ऑक्टोबर महीन्या मध्ये कोरोना रुग्णांचे प्रमाण कमी होत गेले त्यामुळे मा.अति.आयुक्त क्र.२ यांनी आदेश क्र. आमुका/११/कावि/२८०/२०२० दि.१५.१०.२०२० आणि आमुका/३/कावि/३०१/२०२० दिनांक १५.१०.२०२० रोजी काही कोविड सेंटर बंद करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत त्या प्रमाणे कोविड सेंटर्स बंद करण्यात आलेले आहे. या मध्ये पुढील संस्था /हॉस्पिटल यांनी भाग घेतला होता. आणि त्या प्रमाणे त्यांचे कामाची स्थिती आणि सद्यस्थिती पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | आदेश र.रु. | बिल दिलेली र.रु. | बिल दिलेले दिवस | राहीलेले दिवस |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे.आयुश्री मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल | १,३४,३७,०००/- | ९४,११,८७२/- | ६६ | २४ |
| ०२ | मे.साई हॉस्पिटल | ३,२९,१३,०००/- | १,३१,६५,२००/- | ४४ | ४६ |
| ०३ | मे.स्पर्श मल्टीस्पशालिटी हॉस्पिटल | ३,२९,१३,०००/- | - | - | ९० |
| ०४ | मे.स्पर्श मल्टीस्पशालिटी हॉस्पिटल | ३,२९,१३,०००/- | - | - | ९० |
| ०५ | मे.एक्सटेन्सेबल सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी | १,३४,१०,०००/- | ४४,४६,१६०/- | ३० | ६० |
| ०६ | मे.रुबी एलकेअर सर्व्हीसेस | १,३४,३७,०००/- | ६२,१०,८८०/- | ५२ | ३८ |

अति.आयुक्त २ यांचे समितीमध्ये दिनांक ०७.०१.२०२० रोजी ए/बी/सी कॅटेगरी मधील सर्व कोविड सेंटर चालकांचे उर्वरीत दिवसांचे पेमेंट कोणत्या पध्दतीने करायचे या बाबत झालेल्या मिटींग मध्ये संस्थांचे एकूण मंजूर करण्यात आलेल्या दरामधून जेवण खर्च र.रु.१८०/- आणि मेडीसीन चा खर्च र.रु.१००/- वजा करुन आलेल्या रकमेवर ६५%ने कॅलक्युलेशन करण्यात येऊन एकूण बेड संख्येप्रमाणे पेमेंट देणे बाबत सूचना केलेल्या आहेत त्या बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

A Categary

| अ.क्र. | संस्थेचे नाव | स्विकृत केलेला दर | राहीलेले दिवस | एकूण बेड संख्या | जेवणाचा खर्च+ औषधाचा खर्च | देय दर | एकूण देय ६५% प्रमाणे | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे.आयुश्री मल्टी स्पेशालीटी हॉस्पिटल | १४९३ | २४ | १०० | २८० | १२१३ | ७८८ | १८,९१,२०० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | मे.साई हॉस्पिटल | १२१९ | ४६ | ३०० | २८० | ९३९ | ६१० | ८४,१८,००० |
| ०३ | मे.स्पर्श मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल | १२१९ | ९० | ३०० | २८० | ९३९ | ६१० | १,६४,७०,००० |
| ०४ | मे.स्पर्श मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल | १२१९ | ९० | ३०० | २८० | ९३९ | ६१० | १,६४,७०,००० |
| ०५ | मे.एक्सटेन्सेबल सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी | १४९० | ६० | १०० | २८० | १२१० | ७८७ | ४७,२२,००० |
| ०६ | मे.रुबी एलकेअर सर्व्हीसेस | १४९३ | ५२ | १०० | २८० | १२१३ | ७८८ | २९,९४,४०० |
| | | | | | | | एकूण | ५,०९,६५,६०० |

वरील प्रमाणे एकूण सहा संस्थांचे उर्वरीत दिवसांचे बिल आदा करणेकामी एकूण र.रु.५,०९,६५,६००/- एवढा खर्च येत आहे.

B Categary

| अ.क्र. | संस्थेचे नाव | स्विकृत केलेला दर | राहीलेले दिवस | एकूण बेड संख्या | जेवणाचा खर्च + औषधाचा खर्च | देय दर | एकूण देय ६५% प्रमाणे | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | रुबी एलकेअर सर्व्हिसेस | ५०० | २९ | ३०० | २८० | २२० | १४३ | १२,४४,१०० |
| ०२ | रुबी एलकेअर सर्व्हिसेस | ५०० | ३९ | ३०० | २८० | २२० | १४३ | १६,७३,१०० |
| ०३ | डॉ.भिसे मल्टी स्पेशलीटीहॉस्पी. | ५४३ | ०० | २०० | २८० | ०० | ०० | ०० |
| ०४ | डॉ.भिसे मल्टी स्पेशलीटीहॉस्पि. | ५०० | २९ | ३०० | २८० | २२० | १४३ | १२,४४,१०० |
| ०५ | डॉ.भिसे मल्टी स्पेशलीटीहॉस्पी. | ५०० | ३३ | ३०० | २८० | २२० | १४३ | १४,१५,७०० |
| ०६ | डीवाईन हॉस्पिटल | ५४३ | ४० | २०० | २८० | २६३ | १७१ | १३,६८,००० |
| ०७ | डीवाईन हॉस्पिटल | ५४३ | ३७ | २०० | २८० | २६३ | १७१ | १२,६५,४०० |
| ०८ | आयकॉन हॉस्पिटल | ५४३ | १५ | २०० | २८० | २६३ | १७१ | ५,१३,००० |
| ०९ | आयकॉन हॉस्पिटल | ५४३ | २२ | २०० | २८० | २६३ | १७१ | ७,५२,४०० |
| १० | आयकॉन हॉस्पिटल | ५४३ | २५ | २०० | २८० | २६३ | १७१ | ८,५५,००० |
| ११ | आयकॉन हॉस्पिटल | ५४३ | २० | २०० | २८० | २६३ | १७१ | ६,८४,००० |
| १२ | ट्रस्ट हेल्थ केअर | ६९९ | ५९ | १०० | २८० | ४१९ | २७२ | १६,०४,८०० |
| १३ | ट्रस्ट हेल्थ केअर | ६९९ | २५ | १०० | २८० | ४१९ | २७२ | ६,८०,००० |
| १४ | ट्रस्ट हेल्थ केअर | ५४३ | १४ | २०० | २८० | २६३ | १७१ | ४,७८,८०० |
| १५ | बी व्ही जी इंडीया ली. | ५४३ | १६ | २०० | २८० | २६३ | १७१ | ५,४७,२०० |
| १६ | बी व्ही जी इंडीया ली. | ५०० | ५९ | ३०० | २८० | २२० | १४३ | २५,३१,१०० |
| | | | | | | | एकूण | १,६८,५६,७०० |

बी कॅटेगिरी मधील संस्थांना / हॉस्पिटल एकूण र.रु. १,६८,५६,७००/- एवढी रक्कम देय आहे.

C Categary साठी एकच संस्था आलेली होती त्याचा तपशिल पुढील प्रमाणे

| अ.क्र. | संस्थेचे नाव | स्विकृत केलेला दर | राहीलेले दिवस | एकूण बेड संख्या | जेवणाचा खर्च + औषधाचा खर्च | देय दर | एकूण देय ६५% प्रमाणे | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे.रुबी एलकेअर सर्व्हिसेस | ११८१ | २२ | १०० | २८० | ९०१ | ५८६ | १२,८९,२०० |
| | | | | | | | एकूण | १२,८९,२०० |

या प्रमाणे ए/बी/ सी कॅटेगिरी मधील सर्व संस्थांचे पेमेंट आदायगी कामी पुढील प्रमाणे एकूण खर्च येणार आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | एकूण देय र.रु. |
|---|---|---|
| १ | मे.आयुश्री मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल (ए कॅटेगरी) | १८,९१,२०० |
| २ | मे.साई हॉस्पिटल (ए कॅटेगरी) | ८४,१८,००० |
| ३ | मे.स्पर्श मल्टीस्पशालिटी हॉस्पिटल (ए कॅटेगरी) | १,६४,७०,००० |
| ४ | मे.स्पर्श मल्टीस्पशालिटी हॉस्पिटल (ए कॅटेगरी) | १,६४,७०,००० |
| ५ | मे.एक्सटेन्सेबल सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी (ए कॅटेगरी) | ४७,२२,००० |
| ६ | मे.रुबी एलकेअर सर्व्हीसेस (ए कॅटेगरी) | २९,९४,४०० |
| ७ | रुबी एलकेअर सर्व्हिसेस प्रा.लि. (बी कॅटेगरी) | १२,४४,१०० |
| ८ | रुबी एलकेअर सर्व्हिसेस प्रा.लि. (बी कॅटेगरी) | १६,७३,१०० |
| ९ | डॉ.भिसे मल्टीस्पेशलीटी हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | ०० |
| १० | डॉ.भिसे मल्टीस्पेशलीटी हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | १२,४४,१०० |
| ११ | डॉ.भिसे मल्टीस्पेशलीटी हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | १४,१५,७०० |
| १२ | डीवाईन हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | १३,६८,००० |
| १३ | डीवाईन हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | १२,६५,४०० |
| १४ | आयकॉन हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | ५,१३,००० |
| १५ | आयकॉन हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | ७,५२,४०० |
| १६ | आयकॉन हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | ८,५५,००० |
| १७ | आयकॉन हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | ६,८४,००० |
| १८ | ट्रस्ट हेल्थ केअर (बी कॅटेगरी) | १६,०४,८०० |
| १९ | ट्रस्ट हेल्थ केअर (बी कॅटेगरी) | ६,८०,००० |
| २० | ट्रस्ट हेल्थ केअर (बी कॅटेगरी) | ४,७८,८०० |
| २२ | बी व्ही जी इंडीया ली. (बी कॅटेगरी) | ५,४७,२०० |
| २३ | बी व्ही जी इंडीया ली. (बी कॅटेगरी) | २५,३१,१०० |
| २४ | मे.रुबी एलकेअर सर्व्हिसेस प्रा.लि. (सी कॅटेगरी) | १२,८९,२०० |
| | एकूण र.रु. | ६,९१,११,५०० |

या प्रमाणे मा.आयुक्त यांचे सूचने प्रमाणे ए, बी, सी कॅटेगरी मधील सर्व संस्था/हॉस्पिटल यांचे उर्वरीत दिवसांची आदायगी साठी एकूण र.रु.६,९१,११,५००/- (अक्षरी र.रू. सहा कोटी एक्यान्नव लाख अकरा हजार पाचशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, सदर विषयामध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

ए कॅटेगरी

| अ.क्र. | संस्थेचे नाव | मूळ प्रस्तावातील एकूण देय रक्कम | सुधारीत देय रक्कम |
|---|---|---|---|
| २ | मे.साई हॉस्पीटल | ८४,१८,००० | ८२,३५,००० |
| ५ | मे.एक्सटेन्सेबल सॉफ्टवेर टेक्नॉलॉजी | ४७,२२,००० | २३,६१,००० |
| | एकूण र.रु. | ५,०९,६५,६०० | १,०५,९६,००० |

बी कॅटेगरी

| अ.क्र. | संस्थेचे नाव | मूळ प्रस्तावातील एकूण देय रक्कम | सुधारीत देय रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | रुबी एलकेअर सर्व्हिसेस प्रा.लि. | १२,४४,१०० | ३१,२०,००० |
| ०२ | रुबी एलकेअर सर्व्हिसेस प्रा.लि. | १६,७३,१०० | २१,४५,००० |
| ०४ | डॉ.भिसे मल्टीस्पेशलीटी हॉस्पिटल | १२,४४,१०० | १८,३५,६०० |
| ०५ | डॉ.भिसे मल्टीस्पेशलीटी हॉस्पिटल | १४,१५,७०० | २१,४५,००० |
| ०६ | डीवाईन हॉस्पिटल | १३,६८,००० | २१,१८,००० |
| ०७ | डीवाईन हॉस्पिटल | १२,६५,४०० | २३,२९,८०० |
| ०८ | आयकॉन हॉस्पिटल | ५,१३,००० | ६,३५,४०० |
| ०९ | आयकॉन हॉस्पिटल | ७,५२,४०० | १०,५९,००० |
| १० | आयकॉन हॉस्पिटल | ८,५५,००० | ४,२३,६०० |
| ११ | आयकॉन हॉस्पिटल | ६,८४,००० | २,११,८०० |
| १२ | ट्रस्ट हेल्थ केअर | १६,०४,८०० | १३,१६,६०० |
| १३ | ट्रस्ट हेल्थ केअर | ६,८०,००० | १०,४४,२०० |
| १४ | ट्रस्ट हेल्थ केअर | ४,७८,८०० | ७०,६०० |
| १५ | बी व्ही जी इंडीया ली. | ५,४७,२०० | ०० |
| १६ | बी व्ही जी इंडीया ली. | २५,३१,१०० | ५४,६०,००० |
|  |  | १,६८,५६,७०० | २,३९,१४,६०० |

सी कॅटेगरी

| अ.क्र. | संस्थेचे नाव | मूळ प्रस्तावातील एकूण देय रक्कम | सुधारीत देय रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | रुबी एलकेअर सर्व्हिसेस प्रा.लि. | १२,८९,२०० | १२,३०,६०० |

या प्रमाणे ए/बी/सी कॅटेगिरी मधील सर्व संस्थांचे पेमेंट आदायगी कामी पुढील प्रमाणे

| अ.क्र. | संस्थेचे नाव | मूळ प्रस्तावातील एकूण देय रक्कम | सुधारीत देय रक्कम |
|---|---|---|---|
| २ | मे.साई हॉस्पीटल (ए कॅटेगरी) | ८४,१८,००० | ८२,३५,००० |
| ५ | मे.एक्सटेन्सेबल सॉफ्टवेर टेक्नॉलॉजी(ए कॅटेगरी) | ४७,२२,००० | २३,६१,००० |
| ७ | रुबी एलकेअर सर्व्हिसेस प्रा.लि. (बी कॅटेगरी) | १२,४४,१०० | ३१,२०,००० |
| ८ | रुबी एलकेअर सर्व्हिसेस प्रा.लि. (बी कॅटेगरी) | १६,७३,१०० | २१,४५,००० |
| ९ | डॉ.भिसे मल्टीस्पेशलीटी हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | ०० | ०० |
| १० | डॉ.भिसे मल्टीस्पेशलीटी हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | १२,४४,१०० | १८,३५,६०० |
| ११ | डॉ.भिसे मल्टीस्पेशलीटी हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | १४,१५,७०० | २१,४५,००० |
| १२ | डीवाईन हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | १३,६८,००० | २१,१८,००० |
| १३ | डीवाईन हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | १२,६५,४०० | २३,२९,८०० |
| १४ | आयकॉन हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | ५,१३,००० | ६,३५,४०० |
| १५ | आयकॉन हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | ७,५२,४०० | १०,५९,००० |
| १६ | आयकॉन हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | ८,५५,००० | ४,२३,६०० |
| १७ | आयकॉन हॉस्पिटल (बी कॅटेगरी) | ६,८४,००० | २,११,८०० |
| १८ | ट्रस्ट हेल्थ केअर (बी कॅटेगरी) | १६,०४,८०० | १३,१६,६०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | ट्रस्ट हेल्थ केअर (बी कॅटेगरी) | ६,८०,००० | १०,४४,२०० |
| २० | ट्रस्ट हेल्थ केअर (बी कॅटेगरी) | ४,७८,८०० | ७०,६०० |
| २२ | बी व्ही जी इंडीया ली. (बी कॅटेगरी) | ५,४७,२०० | ०० |
| २३ | बी व्ही जी इंडीया ली. (बी कॅटेगरी) | २५,३१,१०० | ५४,६०,००० |
| २४ | रुबी एलकेअर सर्व्हिसेस प्रा.लि. (सी कॅटेगरी) | १२,८९,२०० | १२,३०,६०० |
| | एकूण देय रक्कम | ६,९१,११,५०० | ७,३५,६६,८०० |

वरील प्रमाणे मुळ रकमेमध्ये बदल करून नवीन सुधारित रकमा नमुद करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**अनुकूल - १३** **प्रतिकूल - ०१**

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३५८ विषय क्रमांक – १३

दिनांक – ०८/०२/२०२१ विभाग – आरोग्य मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/९/कावि/३१/२०२१, दि.२०/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील रस्ते यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाज करण्याकरिता निविदा नोटीस क्र.२/२०१५-१६ अन्वये निविदा प्रक्रियेद्वारे मे.डी.एम.एंटरप्रायझेस व मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. या २ संस्थांना दि.१/१२/२०१५ ते दि.३०/११/२०१७ या २ वर्षे कालावधी करिता कामकाज सोपविण्यात आलेले होते. सदर कालावधी संपुष्टात आल्यानंतर उक्त संस्थांना मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२३५७ दि.२८/०२/२०१८, ठराव क्र. २७२२ दि.३०/०५/२०१८ व ठराव क्र.३४१६ दि.२३/१०/२०१८ अन्वये मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदरची मुदतवाढ दि.३१/१२/२०१८ अन्वये संपुष्टात आल्यामुळे ठराव क्र.४०९८ दि.२२/०१/२०१९ अन्वये ४ महिने कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आलेली होती. तदनंतर निविदा नोटीस क्र.८/२०१९-२० अन्वये शहरातील रस्त्यांची यांत्रिकी पध्दतीने साफसफाई करण्याचे कामकाजाकरिता पॅकेज निहाय दर मागविण्यात आलेले होते. तथापि सदर निविदा प्रक्रियेमध्ये तांत्रिक त्रुटी राहिल्याचे निदेर्शनास आल्याने दि.६/०७/२०२० रोजीचे आदेशान्वये सदर निविदा रद्द करण्यात आलेली होती. निविदा नोटीस क्र.७-१ ते ८/२०२०-२१ अन्वये शहरातील रस्ते व गटर्स साफसफाईचे कामकाजाकरिता निविदा मागविण्यात आलेल्या असून सदर निविदा प्रक्रियेचे कामकाज सुरु आहे. सदर निविदेमध्ये शहरातील १८.०० मी. पेक्षा कमी रुंदी असलेल्या रस्त्यांची साफसफाई करण्याचे कामकाज प्रस्तावित आहे. तथापि, १८.०० मी. पेक्षा अधिक रुंदी असलेल्या रस्त्यांची साफसफाई यांत्रिकी पध्दतीने करावयाची असून त्याकरिता निविदा प्रक्रिया राबविण्याचे प्रस्तावित आहे. मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.३१६४ दि.११/०९/२०१८ अन्वये शहरातील रस्ते, मंडई व इतर मोकळ्या जागा यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाजा करिता आर एफ पी तयार करण्याकरिता मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा. लि. यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शहरातील १८.०० मी व त्यापेक्षा मोठ्या रस्त्यांची साफसफाई ही यांत्रिकी पध्दतीने करणेकामी मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा. लि. यांचेमार्फत तयार करण्यात आलेला आरएफपी

मसुदा दि.७/०१/२०२१ रोजी सादर करण्यात आलेला आहे. सदर आर एफ पी चे अनुषंगाने दि.१९/०१/२०२१ रोजी मा.आयुक्त सो. यांचे समक्ष सादरीकरण झालेले असून त्यामध्ये दुरुस्ती करण्याच्या सूचना सल्लागार संस्थेस देण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांचे मार्फत दि.१९/०१/२०२१ रोजी सुधारित आर एफ पी मसुदा सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार शहरातील १८.०० मी. पेक्षा मोठ्या रस्त्यांची चार भागांमध्ये विभागणी करण्यात आलेली असून त्यामध्ये Southern side of head office चे २ पॅकेज व Northern side of head office चे २ पॅकेजअशा रितीने ४ पॅकेज निश्चित करण्यात आलेले आहे. पॅकेज क्र.१ करिता २२१.६८ किमी, पॅकेज क्र.२ करिता २३६.०२ किमी, पॅकेज क्र.३ करिता २३९.८६ कि.मी. आणि पॅकेज क्र.४ करिता २३०.६९ कि.मी. इतकी रस्त्याची लांबी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामुळे शहरातील एकत्रित रस्त्यांची अंदाजित लांबी (Sweeping Length) ९२८.२५ गृहीत धरण्यात आलेली आहे. यामध्ये शहरातील महामार्ग, बीआरटी मार्ग व १८.०० मी. पेक्षा रस्त्यांची लांबी गृहीत धरण्यात आलेली आहे. यांत्रिकी पध्दतीने रस्ते साफसफाई कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या मनुष्यबळाबाबतची माहिती आर एफ पी मध्ये समाविष्ट करण्यात आलेला असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे –

| Sr. No. | Package Details | Contractual Sweeper (Required with Mechanized Sweeping Machines) | Driver (for Mechanical sweepers, transport vehicles & water tankers) | Operator for Mechanical Sweepers | Helper for transport vehicles and water tanker | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Package – 1 (Southern side of head office Ward – ABDG) | 112 | 12 | 8 | 4 | 136 |
| 2 | Package – 2 (Southern side of head office Ward – BDGH) | 112 | 12 | 8 | 4 | 136 |
| 3 | Package – 3 (Northern side of head office Ward – CHE) | 112 | 12 | 8 | 4 | 136 |
| 4 | Package – 4 (Northern side of head office Ward – ACF) | 112 | 12 | 8 | 4 | 136 |
| **Total** | | **448** | **48** | **32** | **16** | **544** |

तसेच यांत्रिकी पध्दतीने रस्ते साफसफाई कामकाजाकरिता आरएफपीमध्ये २४ स्विपींग मशीन ८ हूक लोडर व ४ पाण्याचे टँकर्सची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. तथापि, वाहनांच्या संख्येमध्ये आवश्यकतेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. सदर निविदा कालावधीहा ७ वर्षांचा असून त्याकरिता अंदाजे र.रु.४६३.९४ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. तथापि, निविदा प्रक्रिया राबविण्याकरिता खालील बाबींची पूर्तता करुन कार्यवाही होणे आवश्यक आहे.

१) निविदा कालावधी हा ७ वर्षांचा असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२(ब) नुसार असे दायित्व पत्करण्यापूर्वी मा.महापालिका सभेची मंजूरी घेण्याचे प्रावधान आहे. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया राबविण्याकरिता अधिनियमातील कलम ७२(ब) नुसार मा.महापालिका सभेची अंदाजित र.रु.४६३.९४ कोटी अथवा होणा-या प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

२) मा.महापालिका सभेमार्फत प्रशासकीय मान्यता घेण्यात आल्यानंतर आर एफ पी मसुद्यामध्ये निविदा प्रक्रियेपूर्वी अथवा निविदा प्रक्रिये दरम्यान काही बदल करणे आवश्यक असल्यास उदा.मनुष्यबळ, वाहन संख्या, अंदाजित/ प्रत्यक्ष खर्च इ. सदर बदल करण्याचे अधिकार आयुक्तांना राहतील.

३) निविदा प्रक्रियेअंती निश्चित होणा-या दरास व संविदेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक राहील.

सबब, शहरातील रस्ते, मंडई व इतर मोकळ्या जागा यांत्रिकी पध्दतीने साफसफाई चे कामकाजाकरिता तयार करण्यात आलेल्या निविदा/ आर एफ पी नुसार ७ वर्षे कालावधीकरिता निविदा प्रक्रिया राबविणेकामी व त्यापोटी होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यतेकामी तसेच प्रस्तुत विषयातील कामासाठी अटी शर्ती बदलण्यास मान्यता देणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२(ब) नुसार मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

**अनुकुल – १३** **प्रतिकुल - ०१**

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३५९ विषय क्रमांक – १९

दिनांक – ०८/०२/२०२१ विभाग – मध्य.सा.भां

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/८१/२०२१, दि.२५/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारत सरकार तसेच राज्य शासानाने कोरोना विषाणू Covid-19 प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे अनुषंगाने महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३)(क) नुसार कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी तातडीचे कामकाजास्तव मनपाच्या जिजामाता रुग्णालयाच्या नवीन इमारतीमधील कॉरीडॉर, अंतर्गत व बाहय परिसराची दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करुन घेणेकामी मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. यांना दिलेल्या आदेशाची मुदत संपुष्टात आलेने आवश्यक लागणारे १४ कर्मचारी, मशिनरी, रसायने व इतर खर्चासहित सध्याचा कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव व परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता दि.१३/०९/२०२० पासून पुढील सहा महिने कालावधीसाठी (दिनांक १२/०३/२०२१ पर्यंत) मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., यांचे समवेत करण्यात आलेल्या करारनाम्यास अधिन राहून व अनामत रक्कम घेवून किमान वेतन कायदयानुसार येणारा प्रति महिना खर्च र.रु.३,९१,९७३/-(सर्व खर्चासहीत)प्रमाणे सहा महिने कालावधीकरीता येणा-या र.रु.२३,५१,८३८/- (अक्षरी र.रू.तेवीस लाख एक्कावन्न हजार आठशे अडोतीस फक्त)चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३६०
दिनांक – ०८/०२/२०२१
सुचक – मा.शशिकांत कदम

विषय क्रमांक – २२
विभाग – मध्यवर्ती भांडार
अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभा/१५/कावि/२४/२०२१, दि.२७/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी विविध ठिकाणी देखरेखीखाली असणा-या (Institutional Quarantine) व Covid Care Center येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना व मनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी रुपये 250/- प्रति दिन प्रति व्यक्ति (अक्षरी र.रू.दोनशे पन्नास फक्त) या प्रमाणे दि.01/07/2020 ते दि.09/07/2020 अखेर मे.टॅब किचन यांना अदा कराव्या लागणा-या र.रु 6,72,500/- (अक्षरी र.रू.सहा लाख बाहत्तर हजार पाचशे फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.टॅब किचन, बाणेर रोड, पुणे 45 यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८३६१
दिनांक – ०८/०२/२०२१
सुचक – मा.संतोष कांबळे

विषय क्रमांक – २३
विभाग – मध्यवर्ती भांडार
अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभा/१५/कावि/२५/२०२१, दि.२७/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना व मनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक 10/2020-21 अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रुपये 180/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण 15 पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार पुरवठादारांना अदा कराव्या लागणा-या र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन विषयाच्या सविस्तर तपशिलामध्ये नमुद केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रू.**22,37,580/-** (अक्षरी र.रु.बावीस लाख सदोतीस हजार पाचशे ऐंशी फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.अन्नामृत फाउंडेशन यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.**

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती,** स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक - नस/३/कावि/२५३/२०२१
दिनांक – १०/०२/२०२१



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**प्रत** - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

**(क्र.स्था/शअ/तां/५८/२०२१ दि.२८/०१/२०२१ विषय क्र.१८ चे लगत)**

PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION
EMPANELMENT OF ARCHITECTS/ARCHITECTURAL FIRMS
**BUILDING WORKS (ANNEXTURE 'A')**

| Sr.no | Name of Consultant | Name of Firm / Personal | Phone No | Pan and Adhar no | E-mail | Address | Membership certificate of COA/IIA with Validity | Work Experience | Annual Turn Over | Employee Details | Eligible or Not-Eligibal with Category | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | **CATEGORY-III (~~Above~~ 2-to 10 Cr)** | | | | | | |
| 1 | Nafisa A. Kazi | Archetype Associates | 9922007885 | AZRPK9439K | archetype.associates@gmail.com | Plot No 390 Sector 27/A Pradhikaran Nigdi Pune-44. | CA/2005/37306 valid upto Dec-27 | As per EOI | As per EOI | As per EOI | **Eligible for A-III** | As per Seprate Sheet Attatched |

ADTL. COMMISSIONER
PCMC, Pimpri-18

176

PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION

EMPANELMENT OF ARCHITECTS/ARCHITECTURAL FIRMS

**LANDSCAPPING WORKS (ANNEXTURE 'B')**

| no | Name of Consultant | Name of Firm / Personal | Phone No | Pan and Adhar no | E-mail | Address | Membership certificate of COA/IIA with Validity | Work Experience | Annual Turn Over | Employee Details | Eligible or Not-Eligibal with Category | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | **CATEGORY-III (~~Above~~ 2 to 5 Cr)** | | | | | | |
| 1 | Nafisa A. Kazi | Archetype Associates | 9922007885 | AZRPK9439K | archetype.associates@gmail.com | Plot No 390 Sector 27/A Pradhikaran Nigdi Pune-44. | CA/2005/37306 valid upto Dec-27 | As per EOI | As per EOI | As per EOI | **Eligible for B-III** | As per Seprate Sheet Attatched |

**ADTL. COMMISSIONER**
**PCMC, Pimpri-18**



172

**(क्र.स्था/शअ/तां/४/५७/२०२१ दि.२८/०१/२०२१ विषय क्र.२९ चे लगत)**

**PIMPARI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION EMPANELMENT OF PROJECT MANAGEMENT CONSULTANT**

**WORK EXPERIENCE DETAILS FOR 'B' IV ( ABOVE 50 CRORE ) BUILDING WORK AND STRUCTURES ETC.**

| Sr. No. | Name of the consultant | Details of Experience | Name of firm | Phone No. | Pan & Registration no. | E-mail | Address | Year of Registration | Work experience | Annual turnover | Employee Details Eligible or not eligible(For Which Category) | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | AR. SUNIL B.PATIL | Preparation of detailed Design & Structural Drawing of Buildings, | SUNIL PATIL AND ASSOCIATES | 9822099555 | ABLPP1673N | spa1994@gmail.com | Bungalow no 4, Liberty Society,323 North Main Road, Koregaon Park Pune. | 1994 | 27 Years | 264.07 | Eligible for Category B-IV | NA |

PROJECT MANAGEMENT CONSULTANT

Add. Commissioner
PCMC, Pimpari-1